# कादोडी

नाताळ २५ डिसेंबर २०१६

पासवा वहरी पयलो अंक

(खाजगी वितरन)



# कादोडी

**नाताळश्या हनाव विशेषांक**

**२५ डिसेंबर २०१६**

पासवा वहरी   पयलॉ अंक

एकून अकरावॉ अंक

खाजगी वितरन

---

**या अंकात .......**


संपादकीय

फिल्यात घॅआ फिल्यात - तेरेजा डिसोजा

"मुंशी प्रेमचंद" स्टाईल कादोडी लघु-कथा - सॅबी परेरा

टोपी घायली – एडवर्ड डिसोजा

बय - विजू जे. वाझ

कविता - कुपारी लगीन - मॅल्सिना मायकल तुस्कानो

पोपट - फ्रँक डॉ. मिरांडा

रोटी, सुनिल और स्पीडब्रेकर – सचिन मेंडिस

तिथी वार आन कुपारी ... – शिमा लुद्रिक

कुपारी लोक - रॉबर्ट फर्नांडिस

कविता - दादी -- फ्रँक डॉ. मिरांडा

कविता - हिरान-तांबडा लुगडा - ख्रिस्तोफर रिबेलो


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपलॉ या अंकाविषयीसा मत, तुमाला का आवडला, का नाय, ता आमाला जरूर कळवा. बाजूला दिलेल्या ई-मेल आयडीवर ई-मेल करा किंवा संपादक मंडळाश्या कुनालाही भेटा.


**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**

एडवर्ड डिसोजा

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज

सुनील डिमेलो

डॅनियल मस्करणीस

रॉबर्ट फर्नांडिस

राजन डिमेलो

जेम्सन डिमेलो

रॉबिन्सन डिमेलो

वॉल्टर तुस्कानो

तेरेजा डिसोजा

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :-** www.onevasai.com

**मुद्रक :-** मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६५८७४४९३


**सूचना:-** ‘कादोडी’ या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायर्दे तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तर्हॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन जकल्या वाचकांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायर्दस आहा नाय.**

# संपादकीय

मंडळी, “कादोडी” अंक सालू कॅल्याला ५ वहरे जाले, कडने पटकान ओडे वहरे भरले कय कळला नाय. पन कुहनीही सुरुवात केली आन तॅत तळमळ अहली गा गाडा पार न्यादो कतॅस तरास हॉअॅ नाय. तॅत मंग वॅगळा बळ येतॅ, जिगाळा अही बातमी मिळातॅ गा आपल्या या भाशेओर एक कुपारी नहलेली अन मराठी समाज्यातशी बाई, प्रा. नेहा सावंत पीएचडी कऱ्याशी ठरवितॅ आन मुंबई युनिवरसिटी मिनॅ तॅआ करतान परमिशन पन मिळवितॅ, तिला या कामाकरता आपुन सब्बान कुपाऱ्यायी मदत करॅआ पाय. यी जकला बगताना मनात विसार येते, आपलॉ कुपारी समाज वॅगवॅगळ्या गुनानॅ कॉडॉ शिरमंत हाय. आन मग मॅसपना बगीला गा....

'सामवेदी ख्रिस्ती साहित्य' आन 'मधाच्या घागरी' ये पुस्तके मंजॅ आपल्या भाशेये खास दागिनॅ, फादर फ्रान्सिस कोरिया, पॉल रूमाव आणि बावतीस डाबरे याइ जी मेहनत घेतले त्याये फळे आथ ते... या पुस्तकांसा परत प्रकाशन नक्कीस झाला पाय आन आपल्या प्रत्येकाआ घरा ता पाय. मा मतॅ आपल्या समाजाश्या सब्बान लेखक-कवीश्या पुस्तकांसा परत प्रकाशन हॉया पाय, आपल्या वसयला मराठी साहित्य संमेलन हॉया पाय आन तॅत फा. फ्रान्सिस डिब्रिटोला अध्यक्षपद मिळया पाय, सी.बी. दोडती हारक्या शासन पुरस्कार मिळालेल्या आन फ्रान्सिस लोपीस हारक्या जुन्या लेखकांयी आन त्यांन्श्या लिखानायी नव्या पिढीला ओळख झाली पाय, तरुन कवी इग्नेशियस डायस, फेलिक्स डिसोजा या दोगांना मराठी साहित्यामिनॅ मिळनारॉ मान आन संधी याव मानुसार कॅलॉ गॅलॉ पाय. त्यांश्याबरबर भॉटॉ कवी सायमन मार्टिन, एक कवयित्री भगून गाजलेली सबिना फोस, बऱ्या कवितेयी बऱ्यापैकी जान अहलॅलॉ एडवर्ड डिसोजा यानश्याबरबर आजशे कॉलेजशे पोरे फ्रँक मिरांडा आन मेल्सिना तुस्कानो ह्यांनश्या कवितेआ वाचन कानोर पड्या पाय, डॅनियल मस्करणीसश्यो कान्यो, सचिन मेंडीसशॅ  वेगवेगळ्या विशियोरशॅ लेख, सायमन रॉड्रिग्ज ह्यांन्श्यो पुणेरी तडकावाल्यो आपल्या भाषेमिनश्यो कान्यो, सुनिल डिमेलोसॉ मॅंगो मनुष्य, रॉबर्ट फर्नांडिसश्यो कुपारी कान्यांसॉ खजिनॉ, पयला कादोडी पुस्तक लिवनारॉ सिरील मिनेजिस, तेरेजा डिसोजा ह्यांन्सो अस्सल कादोडी शब्दांव संग्रह अहलॅलॅ लेख, कुहन्याही आंतरराष्ट्रीय विशयोर सहजतेनॅ टिपनी करनारॉ नोएल डिब्रिटो, कुपारी पु.ल. सॅबी परेरा, दोन कादंबऱ्यो तरुन वयात प्रकाशित करनारॉ केविन आल्मेडा ये जकले अॅका जाहीर कार्यक्रमात एकत्र दिखले पात. या कार्यक्रमाला आपल्या खुमासदार निवेदनानॅ चार चाँद लाव्यादो मार्शल कोरिया, राकेश परेरा, शेवर्लस आल्मेडा, एमेल आल्मेडा ह्यांन्शी साथ पाय.

आपल्या "कादोडी" भाशेमिने खुबसा लिखान कहा हॉअॅदे, त्याकरता बोली भाशा विसारांयी दॅवानघॅवान करनारा "कादोडी साहित्य संमेलन" हॉया पाय. आपल्या आथात कॅमॅरॉ घॅऑन संस्कृतीअॅ खुबशॅ फोटो जतान करनाऱ्या रॉजर रॉड्रिग्ज ह्यांन्श्या फोटोंसा प्रदर्शन, "बयशी भेट" घेओन विडिओ रूपात संस्कृतीआ जतान करनाऱ्या सचिन मेंडीस यांना अह्या खुबश्या मुलाखतीमिननॅ ऑ खजिनॉ जमा करॅआ मिळया पाय.

विजय मचाडो, मोनिका तुस्कानो, हेमा रुमाव, मॅक्सवेल लोपीस, लॅरिसा आल्मेडा, जेनी लोबो, लिनेट तुस्कानो, ग्रॅहम गोन्सालवीस या गायकान्शे, उभरतो संगीतकार अॅन्सन तुस्कानो (आर्तॅस बेस्ट ऑनलाइन कंपोझर सॉ पुरस्कार मिळालॉ), पायस करास, मार्शल डिमोन्टी, थॉमस परेरा, नॅप परेरा, वॉल्टर डायस, रॉबिन फरगोज आदी वादकांये शास्त्रीय आन इतर वादनाये कार्यक्रम जालॅ पात.

पॉल डिमेलो, फिलिप डिमेलो, रॉयल रॉड्रिग्ज, ऑल्विन परेरा, रॉबर्ट परेरा, ऑल्विन कोरिया, अर्नेस्ट रॉड्रिग्ज आन बी शितरकाराये शितरे "कुपारी आर्ट गॅलेरी" मिंनॅ लॉकांना बगॅआ मिळाले पात. बबन रॉड्रिग्ज आन आब्राम तुस्कानो या 'वरती करॉ तंगडे खाला करॉ डॉखा, लीवरसा खॉखा करॉ सला' या हरक्या अस्साल कादोडी गानॅ अहेलेलॉ नाटक, रांबाय गावशा सचिन रॉड्रिग्जसॉ "अठ्वरे डॉट कॉम", सेविन तुस्कानो, चार्ल्स गोम्स, रॉबिन रॉड्रिग्ज, डुप्लीकेट गोविंदा डॉमनिक मार्टिन या हरहुन्नरी कलाकाराॲ कारीकरम आपल्या अडेस नाय तॅ मराठी आन हिन्दी शिनेमा वाळयाई दाद दिलेली बगॅशी हाय त्यास जोरोर अस्सल वसयशा कानीओर जालॅलॉ शिनेमा बगॅसॉ हाय.

मंडळी, इ सपना मॅस नाय तॅ आपल्या जकल्या हाय आन ता आपल्यालास पुरा करॅसा हाय. ॲका कादोडी अंकानॅ आपल्या फरगोजीत खूप कय बदल जालॅ आन अजून घडॉन येतॅ आथ.

आपल्या जकल्यांना नाताळश्या हनार्यॉ खुब खुब सुभेच्छा..

## फिल्यात घॅआ फिल्यात – तेरेजा डिसोजा, गास

आलेस : पासु, पॅारा बाल्टिम करॅसा पान नाव का ठॉॲ?
पासु : बाल्टिम करॅसा ना, पान मद्रिन पद्रीन कडॅ शॉद्या जावॉ.
आलेस : मिन्गारशा फरश्या घारा जाय त्याई पोरी लग्नाई हाय तिला कडसा फिल्यात नाय मिळाला आहा कालूस भाटात केळीआ घॉहाट कापितॉता ना तडे बॉलना जालॅ. आन भाटीशा कतु मिनेजशा घारा जाय तॅआव पॉर आगु त्याला हांग.
आलेस : पासु, कुमारी कुपारी फिल्यात घॅतॅत कदो, एक नाता जोडत्याव आन काहा बॉल्या साल्यासा कुनाला मान द्यासॉ ता कळातॅ भगुनुस ना.

पासु पॉसातॅ कतु मिनेजशा घारा हान्शापरा आठ वास्ता. ओट्योर काळोखुस, यांसा घसलेट खपला गा कंद्यो विज्यातॅस. पायरी दिखॅ नाय, पान कयतरी खडबाड खडबाड आवाज आलॉ तही हाक मारली कतुला, "दांडी हाडा, अडॅ हरप बिरप हाय गा बगा". कतु सुली पुड्सॉ दिवॉ घॅवॉन आलॉ तवपोत ता जन्वार पळाला आहा बनॅसकयीस हान्गीला आन पासू हाव्या लागलॉ खाला मुंडी घालॉन ... हा हहा हः ... आन आह्ताआह्तास खॉक्या लागलॉ जुरूकसा ढॉग कॅला. कतुकाको कतुकाको अही हाक मारली. बरा जाला, तुमॅ दिवॉ हाडलॉ तॅ, अडॅ तुम्शी पायरी दिखात नोती भगुन मज्जा केली तुम्शी. कयतरी खडबाड खडबाड आवाज येतॅ आहा हांगीला.

कतुनॅ जोर कॅलॉ, आरे पासु, तुआ आंगात कय खळ कमी हाय गा. दोन पॉराव बाप जालोसॉ पान आन्गाशी खोड कय जाय नाय. तुआ आन्गाश्या खोडी मूळॅस तुआ हयरा ऑथ नॉता...जेत्यायी खोड मॅल्याबगार जातॅ गा. सल, आतॅ, पायरी दिख्ली गा, सड वरती, ऑड्यापरा ॲना कॅला ता?
पासु: कतु काको, मा पॉरा बाल्टिम करॅसा हाय आन कुपारी तुम्शा आगुला घॅ. तू तॅला हांग.
कतु : आरे, पासु आगुनॅ जाम टाकील्ये, पान उठवीतॅ आन विसारतॅ थांब, आगु.... आगु करीत मिन्गारा गॅलॉ,
आगु : रंगात आलॅ, आन गानॅ बॉलातॅ, का, " कॉपात आलॅ रंगात, कॉपात आलॅ रंगात, गजरॅ खातॅ मनात्शा मनात". बाबो, का जालॅ.. मा माग्श्या मांगे लागल्या कादो... मॅ या कडॅ फिरातॅ त्या कडॅ फिरातॅ पान माला निजूस ये नाय. बाबो दोन गानॅ बॉल ना ??

कतु: गाळी देत.... तुआ आयसा नवरा मारी तॅ.... तू रंगा आलॅआ... आन माला हान्गाता गानॅ बॉल गा, लीग्रीई कमी घीत्लोशी तॅ... आतॅ यॅ वारॅ होड ....वराडॅ गा नाय ?? गा अठ्वारॉस रॅ. तुई बाजू कय खरी नाय.. आतॅ तरी डॉळॅ उगड. आतॅ पोरीयॅ निरोप तरी यात गा कड्शॅ. पोरयो खपल्यो गावशो ? तू अहॉ रंगा आल्या पान तुआ कय खरा नाय? मॅ का हान्गातॅ, पासु काका आलॅ, तॅआ पॉराला हातोर घॅ (पद्रीन हान्गात्यात) गा तुला कळदॅ आन इ तुआ घॅना कमी हॉयदॅ. दोन लोक बगीद्यात आन तुला कुना तरी पोरीऑ निरोप येदॅ, दोनी कामे हॉयद्यात. दॅवानॅ विन्वारान कुनाला धाडला नाय. मॅ का हान्गीलॅ ता आईक नायतॅ अहॉ अठ्वरॉस रयाशी बाजू हाय.

आगु: बाबो आतॅस हांग मॅ येनॅ कॉपात हॉयादो. मरीबाय दरी बॅहॅलतॉ नवटाक तोंडोर वाळली, आन खांद्याला तोंड पुहीतॅस तीगाळा तिनॅ पन हान्गीला, एक कडसातरी फिल्यात घॅ गा मंग तुला निरोप कॉबडॅ येद्यात बग??

कतु : पासु, तुआ काम जाला. कॉपात्शी धास्ती करॉ नाका, माव आगु तयार हाय. पान आयत्वारॅ कॉड्यापरा यासा आन कुनाला धाड्दा तॉडॉ निरोप पॉसतॉ कर.

पासु : बरा जाला, एक कॉपात मिळालॉ आगु. पान कुमारी.... कडॅ जाव. कतुकाको, तूस हांग आतॅ कुणा घारा जाव कुमारीदो..

कतु : घोशा घारा जाय.

पासु : घोशा घारा जातॅ सल . घोश्यो आड्वॉ जालॅ. घोशाई बायकू बुजीनॅ विसारला आज अडॅ बरा यॅना कॅला ता! अरदा काम जालॅ आन अरदा रॅलॅ ता तुमॅ पुरा करद्या आहां माला वाटातॅ .

बुजी : का काम काड्लॅ, ऑ माव आडवॉ जालॅ, हांग कां काम हायी.

पासु: कुमारी घ्याशी ऑथा तुम्शा शिशिनला. कुपारीआ काम जालॅ गा आन कुमारी शोदीतॅ.

बुजी : कुन हायी? कतु कुपारीऑ आगु... गा. आन.... हान्गीला शिशिन याशी नाय, तहॉ मांगॅ फिरलॉ. (कॉडला मॅला नाका हा). पासू रीत्या आर्थॅ मार्गॅ फिरलॉ दोन शार आहाडल्यो बुजीला..

पासु : माला माईत हाय बुजी कही आन कून ओथी आन हाय. पान करॅसा का? अड्ल्यॉ हरी आन गाड्वाय पाय धरी. आतॅ कडॅ जावॉ ? मनात विसार करीत निन्गालॉ. कुमारी बग्या कुनाआ ओट्योर सडॉ , या आयला मायला पॉर जालॉ नसतॉ तॅ बरॉ. या करतान कॉडा फिरॅअॅसा. पान फिरॅ लाग्यासास. ऑ भोटॉ हॉअॅ आन माये कुहाटॅ फॉड्यात. पासु डॉख्यात विसार आलॉ आन हान्गातॅ, “मॅ तॅआ शिसोडीश्या फराशी पोरी मरशीलास कुमारी घॅतॅ! फराशीआस घारा लाम्बॉ पाय करतॅ शिसोडीत. आन पासु पॉसातॅ भाटीतनॅ शिसोडीत फराशीआ ओट्योर.

फराशी : पासु, आज तॉडभरॉन अहातॉतो, पॉर जालॅ ना, मंग का, हायी वारी पावशॅरायी अर्दो शेर. आतॅ, आंग धॉया ओडी पीली पान बापानॅ टाप्री मारली नाय हा, पॉरानॅ कुहाटयॅ फॉड्यात. आत्यॅतरी कमी कर? बॉल, ऑडॅपरा कहा का अडॅ यॅना कॅला?

पासु : आहातूस (आहा ये नाय ना पान बनॅ बनॅस आहातॅ), मा जुर्सा काम ऑथा. बाळात इ जालॅ पान माला धंद्याला लाविलॅ गा. पॉरा बाल्टिम करॅ आन कॉपातसा काम जालॅ, तॉ भाटीसॉ कतुकाकाव आगु, कतुऑ पॉर..आगु..गा .. तहॉ मरशीऑ बाबा आन सांतूदादी तयार जाल्ये. मंग जमॅद्यॅ. यायी मनात मांड्य मांडीलॅ.

फराशी : पासु, आहा! बरा जाला मा पोरीला एक फिल्यात मिळाला. पोरीला न विसारतास बाबानॅ मान हालविली आन हा हान्गीला. मनात्शा मनात आहालॉ. बरा जाला आगु तॅ आगु (मावरा नायतॅ लोद मावरा) मा काम भागल्याइ गराज ..... माव आगु कुपारी गा ...हाहाहाहः ...सल एक्दासॉ हुटॅनॅ. मायी मरशी पान वराड्याशी जाले फिल्यात घॅत्ला गा मॅरॅदॅरॅ कळला गा निरोप येद्यात.

पासु : आतॅ हुटलॉ. कुमारी कुपारी मिळाल्यात. फराशीला विसरला, किती वास्ता धाडॉ बॉल्व्यादो कुमारीला?

मरशी देवळा जावॉन आली गा या बास. “कतु मिनेज नॅ हान्गीलॅ, आगु मुंबय जावॉन येदॅ नव वासता.”

आयतवारॅ हाकोटे पॉरा बाल्टिम हाय, पासूनॅ अहॉ निरोप धाड्लॉ हारोडी. हिनवारय हान्शापरा बोळींजसा टांगा हान्गिलॅ. नाताललला हान्गीला जकली तयारी जाले. देवळोर फादरला हान्गीलॅ उद्या बाल्टिम लाव्यासा हाय. किती वास्ता एवॉ. तहा फादरनॅ

विसारला, आन हान्गीला, “पासु ....पॉर गा पोरी. पासुनॅ तॉड भॉटा करॉन हान्गीला पॉर हाय पॉर. पासु आतॅ बास कर. ॲका वहीत नाव लीव्यासा हाय. म्य विसारतॅ तोडी मायती दे पासु.
फादरनॅ पॉराई जन्मतारीक विसारली. पासु हान्गातॅ, माला माईत नाय, फादर हुकुरवाराव दी बगा बावीस दिहाशा आदिसॉ आन तारीख लिवा बास कय हॉअॅ नाय. मद्रीन्सा नावगाव का? मरशी, शिसोडीशी, फादरनॅ हांगीला : आरे पासु मरशी आख्खा नाव हांग. ‘फादर आतॅ “आख्खा कडसा हाडॉ.. आंबॅ पाडॉन जाल्यात, सापना भरलॉता पॅडॅआ राहित. पिकवॉन विक्लॅ आतॅ माव रह निगातॅ बग” लिवा मरशी फराशी लुद्रिक.’ आन पद्रीन सा नाव आगु कतु मिनेज भाटी. जाला, फादारनॅ नावे लीवॉन घेटले आन पॉरा नाव कां थॉव्यासा आहा पासुला फादारनॅ विसरला. पासु हान्गातॅ फादर तुमाला जा आवाड्दॅ ता ठॉआ बास. फादरनॅ नाव हान्गीला डाम्निक (दुमिन), सायमन (शिमा), लुईस (लुसू) कुहना लिवॉ. पासुनॅ हन्गीला शिमाव (सायमन) ठॉवॉ. कादो रॅ पासु आन आहाता कय, सायमन शिरेनिकार ऑथॉ ना येशू बरबोर तहॉ ऑ माव पॉर माला मा खांदयोरसॉ खुरूस घ्यादो मदत करदॅ.
फादरनॅ आय्त्वारॅ हाकोटे १०.०० वास्ता या हांगीला. फादर मॅ खॉल्यॅ, दन्डू, तुळशीऑ पालॉ, शा पात्यो आन आळु लिग्रिया लिग्रिया काडलॅ तॅ मॅ मुंबय जावॉन येतॅ ना? फादर आहातॅ ऑ डॉलात डॉलात कहॉ मुंबय जासॉ. फादरला प्रश्न पडल्य???
पासु  घारा पॉसातॅ ओट्योर सडातॅ तव टॅव टॅव आवाज आय्किलॉ आन तॅआ पॉटात फाळ पडलॉ..मॅरॅ गॅलॉ इनॅ कडॉ घीत्लॉ आन खवळातॅ कॉडी ....हप्पे रात या पॉरानॅ निजॉन दिला नाय मान्दिसाव साला. पयल्या गाडीला जासा ऑथा, गाडी सुकली.. शारशा गाडीला गॅलॉ.... उहूर जालॉ.
आय्त्वार उज्याडलॉ. पाकी (भूटीबयनॅ) आन बनूनॅ (दादीनॅ) तयारी केली. खाट्योर नवा कुब्याट टाकीला, आन काल हारवान कॅलता घर  काहा सापसुप जालता. पॉरा टाव टाव सालुस हॉता. पॉरा आंग धुविला गा नवॅ कपडॅ पांडा टॉपॅरा, गंजी, शड्डी घाय्ली आन देवळा न्याशी तयारी केली.
मद्रीन ला बोल्व्यादो कुणाला धाडॉ ऑ विसार करीत मनीला धाडला कुमारी घारा आन कुपारी घारा धाडला शिमाला. दोगे गेले बोल्व्यादॉ. कुमारी कुपारी आल्ये साडेनव वास्ता. मनी आन शिमा दोगे हान्गातॅत आमादो मद्रीन पद्रीन शा घारा ताता बाफिल्ता आन बर्फी ऑथी.....  शा पान दिलो... वगळ.
भूटीबयनॅ आन दादीनॅ कुमारी कुपारी विसारपूस केली.. आले गा, बरे हा गा. कुमारी तुमसॉ काका शिक् जालतॉ तॉ कहॉ हाय. बरो हाय गा. कुपारी तुमॅ मुंबय जावॉन आलेआ . कुमारी कुपारी दोगे एका खाट्योर भेविल्ये. काकायनॅ ॲका मॅरनॅ फुटलॅल्या कपबशीत बर्फी, हळव्याई तुकडी हाडली आन दुहऱ्या बशीत ताते बाफिलते  त्यायो शार फोडी करॉन त्योर बारीक मिठा वाटॉन टाकीला. आन दुदात जुरुसा जायफाल वाटॉन टाकीला. गराशीकाकय नॅ कुमारी कुपारी खबार घॅऑन पुडॅ ठविलेल्या वस्तूंना आथ लाव्या हांगीलॉ, कुमारी कुपारी नाय नाय कादो करत्या. तुम्श्या नावानॅ कॅलॅ. ताता फॉडॉन आपू नवा नाता जोडलॅ त्याकरतान आतॅ  लाजॉ नाका, कुमारी कुपारी बोयले अहुन्द्ये, पान गराशीकाकय कय कॅल्या आयकॅ नाय. बर्फी घ्या, हळव्याइ तुकडी तॉंडा घाला जुरुसी. दुध घ्या. दोनी कोपे फुटलोत्यें. एकाला कान नॉतॉ पान तहास कुमारी कुपारीनॅ सल्द्ये हान्गॉन वॅळ निबायली. आतॅ सला, देवळा जादो उहूर होयदॅ. फादर पिसाळदॅ.
कुमारी गुलाबा फुलावं कट, हिरवा तोकडॅआ आथाआ लाउस घालॉन आलती. आन कुपारीनॅ तोकडी खाकी तुमन गा तोकडॅआ बावळयाआ सदरा. कुमारी आथा धहडॅव हुडक्यात गॉमारॉन पॉर दिला आन कुपारी दोगे ओट्योरनॅ निन्गाले, बरबोर नाताल गा दोन बारक्यो लान्यो नळडोयो फुली, पाकुला धाडला. देवळा पोस्ले साडे दा वास्ता. फादरनॅ विसारला, पॉरा बाबा पासु करडॅ गॅलॉ. आलॉ नाय तॉ देवळॉर. नातालनॅ लाजात लाजात हान्गीला मुंबय गॅलॅ. यासॉ हाय. फादरनॅ पॉरा नाव का ठॉव्यासा ता विसरला. नाती हान्गातॅ, ॲनॅ तुमाला कय काल हान्गिलॅ ना! नायतॅ तुमॅस का ठॉव्यासा ता ठॉवा नाव. राती बडबडात ये हान्गातोते शिमन ... सायमन अहा कय तरी. फादर उमजालॉ... फादरनॅ मॅस्ता आथा एक ताट दिलॉ त्यात मॅनवात, पानी, तॅल, रुमाल ऑथॉ. मॅनवात दिली कुपारी आथा आन फादरनॅ पराथना केली. तॅल लाविला, पॉरा डॉखॉरनॅ पाणी घ्यायलॉ आन आमेन डोमेन कय कॅला. पॉरानॅ टयाव टयाव करॉन आख्खा देऊळ डोखॉर तुकिला. पॉरा डॉखा पुहीला आन वेदीआ पुडॅ ठॉइला आन कुमारीला हान्गीला, ‘कुमारी, तुमॅ तुका पॉराला. कुमारीनॅ वेंग्यात घीत्ला आन आमे घारा आले.  आंगळयात हाउनॅ गोल कौलात

आग हाडॉन त्योर इशाद टाकॉन धोरी केली, त्योरनॅ पाय टाकोन घरात खिरले. पासुई मुंम्बय घारा आल्ती.... ऑ तयार हॉऑनुस... सगळा जाड पाताळ बॉल्या लागलॅ.... पासुनॅ मटन हाडलोता आन तेरशीदादीनॅ जानु गराशीकाकयनॅ लागॉन हिज्विल्ता.. वास कय लिकॅ नाय. रॉट्यॉ, सानने, फुगॅ केलतॅ. पुना दॅवळात्नॅ आल्योर कुमारी कुपारिऑ मानुसार जालॉ. १२.३० जाल्यात, जिवान तयार हाय. कुमारी कुपारीला हाक मारली, सला हातोर पानी घाला, जीव्यादो जालॅ. आगु कुपारीऑ वेळ जाले जुरुसी घ्याशी हाय, पान हान्न्यासा कुणाला. पासु आलॉ, आगु कुपारी अडॅ या मिन्गारा, मुत्या जाश्या निम्ताण, घोट मारा बास मुक्काय. आन पासु रंगात आलो. ई आमशी बाव गा, तडे धंदॉ करत्याव. ऑ मा काका गा त्यान आमसा जमता हाय.
भुटीबयनॅ ॲका पशंडीत काळजी आठी, ॲका ठॅम्बार्लेल्या पशंडीत डुकरा इंद्याल आन ॲका पशंडीत बकऱ्या मटन. जकला हाडॉन पॅतुलोर ठविला. कुमारी कुपारी लाजॉ नाका हा. घ्या घ्या. दादीनॅ बशी मीनॅ रह गा काळजी आठी दिली आन पाव, फुगॅ गा सान्ने दिले. तॅआ खपातॅ तवूस भुटीबय आली आन उल्कीअॅय धान दिला, तुमादोस कॅल्यॅ गनाय. दोगावं मानुसार जालॉ जिवान जाला. तहे आमॅ जीव्यादो बेहेले. पासुनॅ गावठी हाडॉन ठविल्ती. गव माहनाई घटली आन रंगात आलॅ अड्शो तडशो बात्म्यो काडीत जिवान बॅहॅला. सब्बान खॅलॉरूस जीविले. मजा आली. दॉपारसा का कॅला पुना तातॅ बाफिले आन कुमारी कुपारीऑ मानुसार कॅल्यॉ. कुपारीनॅ बारा रुपय पॉरा डाव्या मुठीत टेकीलॅ. तहास कुमारीनॅ पान टायलीनिशॅ दा रुपय पॉरा उजव्या मुठीत घायलॅ. आन दोगे निग्या लागलॅ. काकायनॅ आठोन कॅली, कुमारी कुपारीआ पदरा कां बांद्यासा? दादीआ पेटीमीनॅ लाडू ठोविल्यात, तॅशॅ कुपारीला एकवीस गा कुमारीला अठरा पोन्या हुडक्यात गाठ बांदॉन द्या. दोगाई सोय जाली आन निगाले.
वेहीपोत कुमारीला पॉशव्या मनी ला धाडला गा कुपारीला पॉस्व्यादॉ पासुस गॅलॉ. पासु हान्गातॅ ॲकादासॉ हुटलॉ.
बाल्टिम जाला झकास.
हॉमावारॅ हान्शापरा नाती आन सायमन (पॉर) दोगाना घॅवॉन पासु हारोडी पॉसलॉ. आतॅ मॅ कय लवकर या नाय, पासुनॅ हरॅआला खुनाईला आन डॉळॉ मारलॉ. हरॅआनॅ पेटी फटीत लीक्विल्ती ती बाटली काडली आन घोट घोट सुखाला घेटली आन पासु रस्त्याआ लागलॉ.
बाळ येशुई कुरूपा .....

## "मुंशी प्रेमचंद" स्टाईल कादोडी लघु-कथा - सॅबी परेरा, भाटी नानभाट

पाते रात्सॉ वखत. मिंगारसॉ कुडाव दरवाजॉ उघडॉ ऑथॉ. मस्त वारा येतॉता. कोसूला ढाराढूर नीज लागलोती. ओहरीशा कौलामिनॅ घायलेल्या काशीआ तुकड्यातनॅ आख्या घरात सांदना पडलॉता. कुनाइ तरी भय गॉठ्यात हांबारतोती. माळोर उंदराव पकडापकडी खेळ सललोतॉ. ॲ आवाज रॉजशॅस. या आवाजाय घरात कोसूइस का कुनाइस नीजमोड हॉअॅ नाय. ते नहलोशे तॅ आलोखत नीजमोड जालोशी.
घरसा जकला लोक घरातूस हाय. मंग दरवाजॅआ बार इ कुन उबी रॅलॅला दिखातॅ? ऑड्यापारा कुन बायारसा माहनू कादो यासा? धोतिन नाय तॅ हडळ हायदेआ? धोतिन नातॅ हडळ खॅप्पॅन घारापोत आलॅला तिनॅ कुनादरनॅ अजून आयकीला नॉता. इ भूतूस हायदॅ बवतेक ! कोसूनॅ खाट्यातनॅस भूताय पावले उलटॅबिलटॅ दिखात्यात गा बग्यासॉ प्रयत्न कॅलॉ.
आंगळ्यातशा खांबोर शाळीसाऑ पिवळॉ बल जळतोतॉ. तॅआ बलसॉ उजेड गरूले करीत करीत दापुडशा दरवाजॅआ खालशा फटीतनॅ घरात येतोतॉ. ओट्योरशॅ तॅ दोन पाय गरूले करीत येणा-या उजॅडाला अडवितोतॅ.
कडेतरी लांब मांजरीआ खॅकाट पडल्याव आवाज आलॉ. कॉलॉ एकदा कॅकलॉ, दोनदा कॅकलॉ अन मांगोमांग कुत्रे भॉखॅआ लागले. भॉखता भॉखता एक कुत्रा रडॅआ लागला. कुत्र्याआ रड्याय कोसूआ आंगोर काटॉ येतॅ.

जून उगवालॅ तरी पान्याव कय पत्तॉ नाय. गरमी ओडी की बॉल्या नाका. पन कोडी जरी गरमी अहली तरी कोसूला आंगोर पागुन लागातॅस. पागुनाकरता घॅटलॅला बाबाआ पोन्या डॉळ्याहरी घॉऑन कोसूनॅ डॉळॅ मिडकीलॅ. पन् ओट्योरशॅ तॅ दोन पाय कय कॅल्या डॉळ्यापुडशे जादो तयार नॉतॅ. मंग ती कड्या फिरली अन् नीज्यासॉ प्रयत्न क-या लागली.
तुमे डॉळॅ मिडका गा मिकडा, एकदा शेत पडलॉ गा पडलॉ, नीज उडली ती उडली.
कोसूआ ऑडॅ-या डॉखॅआत हजार विसार या लागलॅ...
गावड्या दॉस्ताला भय बाळग्या दिले तॅऑय गॅल्या मयनॅय पैशे द्याशे हाथ. पन तॉ अहॉ पातेरातसॉ पैशादो यासॉ नाय. तॅला कय पैशाइ अडसन आले हायदॅआ?
मरशी काकयशी गाय वेयोर आलती. तिनॅ पॉराला कदो बॉलव्या धाडलॅ हायदॅआ?
कडे आगाय-नंदाखाला नाय तॅ इमळोर कुन मॅलॅ हायदॅ अन् कळव्या आल्यात हायदॅआ?
वयनीऑ राजू काल मामारा गेलतॉ, तॉ निजॅ नाह्येदॅ, रडातॅ हायदॅ भुगून त्याला परत घिती आल्यात हायदॅआ?
नवरी-दादयला तिआ हाऊनॅ हांगिलता 'मॅ मेली गा भूत होऑन तुआ मानगुटीओर बॅहॅनॅ.' इ त्या डोकरीआ भूत नवरी-दादयला शोदीत आलॅ हायदॅआ?
कोसूला कय सुशासा रॅला. पराथना करॅआ लागली, तॅ पराथना पन् सुश्याशी रेली. कॉनाडात मावलीआ पुडॅ पराथनेआ कागात अन् जुना बायबल होता ता काडला. कौलामिनॅ घायलेल्या काशीआ तुकड्यातनॅ ॲना-या सांदन्योर बगिला. कागात तॅलाय भिजलॉता. बायबल उंदरानॅ कड्डॉन कड्डॉन हुट्टा कॅलता.
कोसू परत आली. दरवाजॅआ खालनॅ ॲना-या उजेडात त्या दोन पायाव ऑळॉ अजून दिखातोतॉ.
उंदरानॅ कड्डीलॅला बायबल ताहास हातात धरॉन, रक्षक दूताइ पराथना बॉलात बॉलात कोसूनॅ हिम्मत करॉन हळूसकन दरवाजॉ उघडलॉ.
तिनॅ बगिला, ओट्योर पांडा नववारी लुगडा नेहलेली, माथा मॉकळा होडलेली एक बायकू लुगड्या पदरात साऊळ घेऑन उबी ओथी.
कोसूआ आथापायात बाडूक आलॅ. बोल निंग्यासॉ रेलॉ. घसॉ हुकलॉ, हो लागलॉ. आंगाला कापरी फुटली. ऑड्यात ती बाई बोयली .....
... कोसूआ तुला हाको कोड्यो द्याशो! आज रमॅदसॉ पयलॉ वार गनाय. मॅ नवस बोयलॅ. भीक मांगॉन, मॉकळया माथ्याय सलात येनॅ.... एक मुठ साऊळ मा पदरा टाक अन् मा बरबर येता तॅ सल. ऑड्या लांबसॉ पल्लॉ. तू हरी आली तॅ बरा हॉयदॅ !

## टोपी घायली – एडवर्ड डिसोजा, सोजआळी

आपलॉ आगू मिंजॅ आख्ख्या फरगोजीत नावाजलॅलॉ. जहा तॅआ मन भॉटा ताहास तॅआ कुटूम. परमीसरानॅ आगुला भर भरॉन दिलॅ. जमीनजुमला पन ऑथा. शार बाहा. आगु, देगु, शिमु आन पेद्रु. शार बेनी. कती, दुमी, बाजी आन फरशी. शार पोर. दुमिंग, पावलू, इग्याव आन अंदऱ्या आन दोन लेकी इमा आन गराशी. आगुॲ पॉर मिंजॅ घरायो शार मेडी. जकले वराडॉन मार्गाला लाग्लोते. पोरेटारे लानेभोटे सब्बान जमले तॅ बी कुना पय पावन्याला बोलव्याशी, हाक द्याशी गरज नाय पडॅशी ऑडा भोटा कुटूम. खातापेता आन आनंदी घर. सुखादुखाला जॉ तॉ उबी. आगु जकल्यात भॉटॉ भगून घर तॅआ हांगन्यानॅ सलॅसा. अडल्यानडल्या माहनाला मदत करॅदो आगुनॅ कतॅ नाय हांगीला नाय. तॅतॅन तॅला फरगोजीत मान. पावनॅआ घारा कडे गॅलॉ आलॉ तॅ तडशा मॅरदॅरशा लॉकाइ खबार घॅसॉ.

आगुआ वय जाल्ता पन भाटात काम करतॉतॉ तॅ दिखातोतॉ कडाक. एक दी आगुआ आंग तापल्यागत जाला. दॉपार तिपार भाटात काम कॅलॅ तॅ तब्बॅत तापले अही मनाई समजूत करॉन आगुनॅ त्योर लक्ष दिला नाय आन घारा कुनाला बोयलॉ नाय. हळूहळू आगुइ खावटी कमी जाली. वाडलॅला घशातनॅ उतरात नॉतॉ. पन आगु मॉडक्याहरी पान्याव घोट घ्यासॉ आन ताहाबाहा जिवॅसॉ. अंदऱ्यानॅ एक दी विसारला, 'बाबो, तु पयल्या हारकॉ जिवा नाय, कय बरा करी नाय गा का?' 'नाय नाय, आर्तॅ वय जाला. खावटी कमीस हॉअॅशी' आगुनॅ वॅळ निबावॉन निली. एक दी आगु भाटातनॅ घारा आलॉ आन पायरीओर सडातॅ तव तॅआ छातीत कळ मारली. आगु तडेस फलाटीओर बॅहॅलॉ. पॉरांना हाक मारली. डॉळॅतनॅ आहू आलॅ. पोरे रॉजशे येत्यात तहे आले आन बगीत्यात तॅ का... आन मंग बोंबोहाको सुरू जाल्यो. घरशॅ, मॅरदॅरशॅ हिंदाळॅ काडलॅ. गावागावात, पयपाव्ना, देवळा फादरला हांग्या माहने रवाना जाले आन आगु घारा लॉकाइ रांग लागली. आगुआ पॉराइ काकांना-बायांना विसरॉन आगुऑ दी (हातवॉ) करॅसॉ ठरवीलॉ आन पयपावना, गावशा लोकांना ताहा हांगीला.

हातवॅआ दिहा हाकोटशे जकले मिस्साला गेले. खाश्योर भाटातशे फुले टाकॉन खास हज्विल्ती. मॅनवाती लाऑन खाश्योर पराथना केली. बेजीमताऑ पानी टाकिलॉ. आन जकले घारा आले. घारा आल्योर पन पराथना जाली. शा-पानी जालॉ आन लोक रस्त्या लागले. ११ वास्ता आगुऑ भॉठ्ठॉ नातू गावात आवतान द्या गॅलॉ. लोक जमला माकून एकदा जिवान बॅहॅशा आदी पराथना जाली आन बायको पोरे जिव्या बेहेले. गव माहना करता खास 'पिवरशी सोय' ओथी. आहात-खॅळात जीवने आटपाले. जावाय लॉकाइ घरशे काडलॅलॅ हिंदाळॅ टांगवीलॅ आन मंग घरशा लोकां डोख्योर टोप्यो घायल्यो. आर्तॅ सब्बान लोक हिंदाळयात आन बाकोर बॅहॉन आगुयो आठोनी काडॉन त्याबद्दल मनात अहलॅला प्रेम बॉलॉन दाखड्या लागले.

(पयल्यानशा काळात गव माहनाव पॉशाक मंजॅ पोन्या, पांडा सदरा, कब्जा आन डोख्योर तांबडी नार्तॅ काळी टोपी. घरात मरान जाला गा गव माहने टोपी काडॉन खुटीओर ठवेशॅ. डोख्योरशी टोपी काडना ई दुख झाल्याई खून होती. मंग हातवॅआ दिहा जावाय मंडळी जिवान जाल्योर गव माहनांना टोप्यो घाल्याशे. आते टोपी रेली नाय भगून इ रीत बंद जाले)

## बय - विजू जे. वाझ, दारसेंग

धामधूम सललॅ, आख्खॉ गाव जमलॅ, पै-पावने सगळॅ आल्यात. बंगल्यापुडॅ भारी भारी गाड्यो उभी हात आन फादरशी वाट बगार्तॅ, एकदासॉ फादर आलॉ, घरातशे जकले बार आले, ती आन तॉ, दोगे झगमगटात दापुडॅ आले, फादरश्या हातात हात दिलॉ आन कार्यक्रमाला सुरुवात झाली.
फादरनॅ विसार कॅलॉ, जकले दिखात्यात पन घरासा एक माहनू दिखॅ नाय, हातात लुजार घॅऑन खान्द्योर पांढरॉ हुडकॉ टाकॉन हाकोटे पासश्या मिस्साला रॉज यॅनारी बय कडॅ हाय? फादरनॅ हळुस तिला विसारला, ती हांगार्तॅ, फादर आमशे सगळे व्हीआयपी लोक याशे आन माये पावने भोटया घरशे, आमश्या स्टेटस सॉ प्रश्न हाय भगून बय जुन्या घरात रॅर्तॅ, तिला हांगीला तू तडनॅस बग.
फादर का समज्यासा ता समाजलॉ, फादर सरळ जुन्या घरात गॅलॉ, बय तडे लुजार घॅऑन प्रार्थना करीत बेहलोती आन मावली दरी पॉर, ऑबाय आन नातवंडे सुखी रेवो अही प्रार्थना करतोती. फादर विसार करीत बार आलॉ, ओबायला हाऊ पा नाय, हावू पॉर ऑबाय करता प्रार्थना करर्तॅ, इ कुहनी संस्कृती. रॉज मिस्सा, पवित्र आत्म्यायी प्रार्थना, देवळात, समाजात पुडॅ-पुडॅ, ऑ जकलॉ मान, गर्व याव का फायदॉ ?

# कुपारी लगीन

**१. हिनवारसॉ दी.**

उजाडलॉ दी हिनवारसॉ, दी ऑथॉ तॉ मांडवासॉ,
तयारी सालू जालती लग्नाआ आदीशी,
आन धावपळ उडालती वरमायशी,

रसत्योर उबॅ ऑथॅ गवमाहने,
तॉरान बांदीला नवरॅआ भाहानॅ,
घरात गर्दी जालती पावन्याई,
अन नवरॅआला घाई जालती लग्नाई,

आंगळयात मांडव बरॉ सॉबातोतॉ,
ओट्यावर बॅहॉन नवरॉ नवरी आठोन काडतोतॉ,
साडे स जालॅ हांनशापारशॅ,
बाजॅ वालॅ ऑथॅ करास कंपनिशॅ,

वरमायश्या बाजूला लोक ऑबडा,
तीनॅ नीहीलता तांबडा लुगडा,
वरबाप तॅ पोन्या टोपी कब्जा मीनॅ हजलॉतॉ,
वरमाय हांगडॉ तॉ पन सॉबातोतॉ,

नवरॉ शॅरवानीत दिखातोतॉ बो भारी,
वख्ता वख्ताला मोबाईल वरनॅ नवरीला फोटो धाडी,
बाजॅ वाजवितोतॅ करास कंपनी वालॅ,
मांडवात नासातोतॅ आखॅअॅ गाववालॅ,

वखत जालतॉ आएज घ्याऑन जादो,
बायकांशी गर्दी जालती मांडवाबायार उभी रॅआदो,
खीसॉ खाली जालतॉ नवरॅआ भाहासॉ,
नोटयो आख्यो दिलत्यो शंभरश्यो,

पॉसलॉ एकदासॉ आएज नवरी घारा,
अन बरा वाटला वरमायला,
रांग लागलोती भोटी जिव्यादो,
जकल्याना पावोता बकऱ्या मटन खादो,

गावाशॅ पॉर नासातॉतॅ अकरा वाजॅआ पोत,
करास वालॅ वाजवितॉतॅ बाजॅ थकॅआ पोत,
हिनवारसॉ दी बरॉ भरलॉ, नवरॅला आयत्वारसॉ रंग सडलॉ...

**२. आयत्वारसो दी**

उंगावलॉ आयत्वारसॉ दी,
नवरा नवरी ऑ लग्नाऑ दी,
नवरॉ सॉबातोतॉ काळया कोट मिनॅ,
अन नवरी सॉबातोती पांड्या गाऊन मिनॅ,

लगीन लागला दॅवळा मिनॅ,
आशीर्वाद मिळालॉ फादरांदरनॅ,
दोगेपन लग्ना गाठीत बांधले गेले,
दोन जिवांशे एक जीव जाले,

हाकोटसॉ प्रोग्राम जालॉ नवरी घारा,
आतॅ जकले लागले नावळी तयारीला, हांशापार जाली,
खरी मजा आतॅ आली,

अरबी, मद्रासी, कोळी, बंगाली,
जकल्याई कपडेस घायलते लय भारी,
डॉन शा गान्योर जकलेस नासले,
वाजवॉन वाजवॉन बाजॅवालॅ पन थकलॅ,

नवरी खूप सॉबातोती,
अन वरमाय खूप उडातोती,
नावळ नवरॅश्या मांडवात आली,
आणि प्रोग्रामला सुरुवात झाली,

प्रोग्रामला आलता राज घरण्यासा रूप,
प्यादो ऑथॉ बकऱ्याव सूप,
नवरी नवरॅआइ जोडी सॉबातोती,
आज त्याई मनोकामना पुरी जालती,

हळूहळू लॉकांशी गर्दी कमी झाली,
मांडवाई अर्धी जागा खाली झाली,
धावपळ आणि आनंदाआ रूप आला आयत्वारशाला,
अन अखेर नवरी मिळाली नवर्याला.

**- मॅल्सिना मायकल तुस्कानो, घोहाळी, नंदाखाल**

# पोपट - फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे

देवळा घाट वाजॉन बरॉस वखत जाल्तॉ. दुनिया काळॉखात बुडलोती पन हाल्ली शिमा घारा निग्यासॉ कय बेत नॉतॉ. जकला हिवार आन भाटे खाली जाले पन शिमा हाल्ली भाटात खप्रॉस होतॉ आन शिमानॅ हरी घॅटलॉता बस्त्यावला. दि मावाळलॉ गा बस्त्यावला बरोब्बर सात वास्ता गावठीयॉ पयलॉ ढोस, आठ वास्ता दुहरॉ आन दोन ढोस मिने बस्त्याव आडवॉ जालॉ नायतॅ नऊ वास्ता तिहरॉ ढोस, पन आज आठ हॉत आलॅ तॉपोत बस्त्यावशा तोंडा कय लागला नॉता.

"शिमा, तुला घारा कुन विसारता हाय गा नाय? रात अर्डस काड्याशी गा का? मा आंगाला कापरी लागली बग," डॉखा खाजवित बस्त्याव बॉयलॉ. "ऑ शेवटसॉ वापॉ रेलॉ तॉडॉ खपवितॅ, मग निगॉ," दांड साप करीत शिमा बोयलॉ. "कॉपात तू कय केसर लाईलॅ गा का? पालक गनी. या मायशीमारी तॅ जुडीयॅ २ रूपय देत्यात. त्यामिनॅ मा पॉराला सनॅ पन येत नाय," पालकाई जुडी टोपल्यात भरॉन बस्त्याव बॉयलॉ. "२ रुपयशॅ सनॅ तू पोराला पुरात नात मंजॅ तू पॉर उस हाय गनी गा घॉड्या पिल?" मस्कारित शिमानॅ विसारला. "जा हायदॅ ता; तु यॅ गा मॅ निंगॉ?" बस्त्याव अतॅ जाम वैतागलॉ. "कोपात आज अमावशा हाय." शिमा बोयलॉ. दोगी पन जाम घाबरे हॉतॅ आन अतॅ अमावशा हाय इ कळताबरबर बस्त्यावशी जरा जास्तीस फाटली. एकदासा हिपना खपला आन जोडी घारा या निगली. "उद्या हाकोटॅ यासॉ गा तू?" शिमानॅ विसारला आन बस्त्यावर बगिला. पन बस्त्यावनॅ पुडॅ कय तरी बगिला आन गप बॅहॅलॉ. "का जाला?" शिमानॅ विसारला. "पेद्रु हॅतात बग ना रॅ, ती कुण उबी हायदॅ," बस्त्याव बॉयलॉ आन शांत जालॉ.

सांदना नॉता बगुन बस्त्याव शिमाला का दावडतॅ ता बग्या जरसा भारी पडला पान जिगळा शिमा नंदऱ्या ती पडली तिगाळा शिमाईपन तोडीस टरकाली. "हेलन नायदॅ गनी कॉपात?" बस्त्याव बोयलॉ. "कुना गाई? आज बी अमावशा खराब दी गनाय. माग्शा वहरा आपल्या देगुआ नवरी आंगात आहास कय खिरलॉता आन तिला कर्ड-कर्ड नाय फिरविला तिनॅ," शिमा बोयलॉ. कर्ड-कर्ड फिरविल्ता मरीला?" बस्त्यावनॅ बारक्या पोरा घत विसारला. "तुआ बाबा **त," बस्त्यावसा आख्खा डॉखा हाल्दॅ ऑड्या जोरायॅ टापरी मारॉन शिमा रागायॅ बोयलॉ. "सल लवकर," शिमा बॉलॉन पुडॅ सल्तॉ जालॉ. "तू डॉखा फिरला गा का? आपल्या आंगात आली तॅ का कऱ्यासा? आपुन त्या पक्षा बिदितनॅ जाऑ सल," शिमाऑ हात खेचीत बस्त्याव बोयलॉ. "पालका जुडीला २ रुपय तरी येत्यात पन तू डॉख्याला कुन रुपय पन द्यासा नाय. वॅड्या इ** हाळा," शिमा भडकालॉ आन पुडॅ सल्तॉ जालॉ.

अह्या दिहा बिदितनॅ जासा मंजॅ भुताला आपल्या आंगात आमंत्रन द्यासा ई बस्त्यावला माईत नॉता हायदॅ कदाचित. या बिराड एकदासा पेद्रू हॅतामॅरॅ आला आन अतॅ दोगी जाम घाबरले. बस्त्यावशा आंगला सरसरॅ घाम फुटलॉ. पांड्या साडीशी बाई अजुन तडॅस होती आन हात पसरलॉतॅ. अतॅ कय तरी गडबड हॉनार ई दॉगांना उमजाला. "एक-दोन-तीन.... बॉलॉन बस्त्यावनॅ धाव्या सुरवात केली आन त्या मागोमाग शिमानॅपन. दोगी बरॅस लांब आलॅ आन शिश्या झाडाखाला उबी रेऑन त्या बाईओर बग्या लागले. ऑड्यात त्या बाईशा मॅरॅ उबी रॅलेल्या कुत्र्यानॅ ती खाला पाडली. "या बा झ** रे, आरे बसत्याव बैला ती हेलन नोती ना काय ता भुजगावना हॉता भुजगावना. भागात कावळॅ येत्यात आन भाजी खात्यात त्यांकरता लाईलता," शिमा जाम आहात बोयलॉ. "या पेद्रू मायला, उद्या मिसाला भेटुंदेबास घॉकॉ देतॅ बग बास, यानॅ आपलॉ "पोपट" केलॉ रॅ," बस्त्याव बोयलॉ आन शिश्याखाला आरामात बॅहलॉ.

# रोटी, सुनिल और स्पीडब्रेकर – सचिन मेंडिस , जापके

काल घारा गॅलॉ तॅ समोर गराम गराम शा आन तळनाई रोटी. नाय लगनॅ नाय कय सॉहळॅ, पन कुपाऱ्याला रोट्यो काडॅदो कय कारन लागातॅ गा? बॅहल्या जागी मॅ ४ जाग्या लाविल्यो. मॅ विसारला तॅ कळाला गा मराडीशा मावशी घरनॅ रोट्यो आल्त्यो. मावशी अमॅरिकेला गेल्ती तडनॅ कुहनॉ तरी 'लॉ कोलेस्ट्रोल' पीठ घॅऑन आल्ती. घारा डॉक्टर अहलॉगा ऑ प्रॉब्लेम. असो, मा तॉडा लागली ना, ता बस झाला. मम्मी हांगातॅ ५ रोट्यो पहरावशा सुनीलला दिल्यात अन पॉशव्या हांगिल्यात. रोटी खादो बरी रॅ, पन वाटनी पॉशव्याशी मंजॅ रोटीमिनशा तॅलाहारकीस कटकाट. मॅ विसार कॅलॉ यो वाटनीयो रोट्यो मॅ खातॅ अन उद्या सुनीलला समजाऑन हांगातॅ. पन कुपारी सातबारॉ फिरविदॅ पन 'तळनाई रोटी' अन 'वालाइ भाजी' या बरबर गद्दारी नाय करॅसॉ. अन सुनील तॅ रोट्याऑ वॅडॉ, त्याई वाटनी पोसली पाय. मॅ सुनीलला फोन लाविलॉ आन हांगीला शा करॉन ठव मॅ रोट्यो घॅऑन आलॉ.

मम्मीनॅ प्लास्टीकशा काळ्या पिशवीत ५ रोट्यो घालॉन दिल्यो. आतॅ मा बुलेटला डिगी नाय तॅ तहिस ती पिशवी मॅ हँडलला टांगविली अन गाडी बोळींजनॅ नंदाखालला हाकिली. एक तॅ बुलेटसॉ ब्रेक कमी लागातॅ अन वरती रस्त्यात ॲ ऑजलॅलॅ भॉटॅ स्पीड ब्रेकर टाकील्यात. त्या स्पीड ब्रेकरशी लांबी रुंदी उंची बगीली गा टाकनारॉ 'आडसळ' हायदॅ इ मॅ अनुमान काढला. (मा कय सुकलॅ हायदॅ तॅ बी बरा नाव सुसवा). मॅ वर खाला वर खाला करीत जे पी नगर मार्गे पहरावात एकदासॉ पॉसलॉ. बवतॅक पॉटात शा आनी रोटी पक्के वितळल्यात हायद्यात. सुनिलशा आंगळ्यात पॉसलॉ तॅ सुनीलशी नवरी आथात टोपला घॅऑन उबी. अरे माझ्या देवा, मॅ विसार कॅलॉ जेमतॅम ५ रोट्यो हाडल्यात अन इनॅ जाम होस केलेली दिखातॅ. मागोमाग सुनील आथात शा शे २ कपे घॅऑन उभी. सुनील हांगातॅ, 'मेंडिस, रोट्यो कडे हात.' अरे माई खबार घ्याशी हॉडॉन पयली याई रोट्याई सवकशी (उतळी ई कुपाऱ्या DNA मिनॅस हाय). मॅ हँडलला लाविलॅल्या पिशवीला हात लाविलॉ तॅ पिशवी पतिंगा हारकी हुरातॅ. मला घाम फुटलॉ. बगीतॅ तॅ पिशवीला पन घाम फुटलॅ. वाटला पिशवीला पन गर्मी करतॅ हायदॅ गा का? नंतर कळाला कय नाय, पिशवितनॅ तॅल टपकातॅ. माला कळाला रोट्यो अगोदरूस टपकाल्यात. रस्त्यात गेम जालतॉ. मॅ सुनीलला हांगीला 'सुनिल, तू होस केले रॅ पन रोट्यो रस्त्यात पडल्यो वाटातॅ'. मॅ ऑडा बॉले बस तॅ सुनीलशा नवरीआ आथातनॅ टोपला आन सुनिलशा आथातनॅ शा सा कप धपकन खाला पडला. का कुना हांगॉ माला टोपला भरलेल्यो रोट्यो आंगळ्यात गाडकुलीघत पळताना दिखल्यो.

ऑड्यात सुनील सॉ पॉर ओट्योरनॅ बोयलॉ, 'सचिन अंकल, तुमाला नंदाखालसॉ रस्तॉ माइत ऑथॉ भगुन तुमॅ जेपी नगरनॅ टर्न घॅतलॉ, बवतॅक रोट्यो सरळ आगाशी रोडला गेल्यात हायद्यात'. मॅ तॅआ तोंडोर बगीला. तॉडात गाळ आलती पन सुनिलसॉ तापाट स्वभाव माला माईत ऑथॉ भगुन मॅ गाळ तहिस तॉडात गिळली. सुनिल मान्या तयार नॉतॉ. हांगातॅ 'यात कय तरी राजकारन हाय'. अडे राजकारन करॉन माई होस पुरले अन माला माईत हाय की पिशवीशे माये ५ नगरसेवक वोटिंग हॉॲशा अगोदरूस पडल्यात. मॅ सुनीलला हांगिला, 'खॉटा वाटातॅ हायदे तर मा मांगे भे अन सल'. माला वाटला सुनीलनॅ विषय खपवॅ पन यानॅ गाडीआ मार्गॅ पाय टाकीलॉ. आतॅ इलाज नॉतॉ. आमशी फटफटी उरफटी निगाली.

जेपीनगर ये तो बगितॅ तॅ पयल्या स्पीडब्रेकर पा एक कागुळॉ पायात रोटी धरॉन सोशीॲ कडूडीतॅ. मॅ सुनिलला हांगिला तडे बग एक नगरसेवक हापडलॉ बघ. कागुळ्यानॅ आमशोर बगिला अन फुर् उडालॉ. सुनिल शिडलॉ, हांगातॅ या कागुळ्या आयशा नवरॅनॅ रोट्यो धाडल्योत्यो गा. ता आयकॉन माला सुनिलशा नवरी आथसा टोपला आठवाला. सुनिस सॉ का दोष करॅसॉ कुना पन नवऱ्याला राग ॲनार. आमॅ पुडॅ निगाले. गिअर बदलॅ तॅ दुहरॉ स्पीडब्रेकर आलॉ. सुनिल बोयलॉ, 'ॲ ब्रेकर जुळॅ जन्मा आल्यात वाटातॅ, सगळॉ वॅड्यावं कारभार'. माला कळातॉता ई रोटीआ दुख हाय पन तॉड उगडला तर मा पाठीत येदे. सुनिलनॅ अडेतडे नंदार मारली तॅ बाजूशा गटारात एक रोटी तरताना नंदऱ्या पडली. सुनिल बोयलॉ, 'ती बग

हापडली'. मॅ हांगिला, 'घरनॅ गरय घॅऑन येव गा.' सुनिल का उमज्यासॉ ता उमजालॉ. आमॅ पुडे निगाले. बोळींज सॉ टर्न ये तव स्पीड ब्रेकरसॉ भॉटॉ भावजी लागलॉ. आमॅ दोगु त्यावरनॅ आपटाले आन बाजूशा झाडामँरे पोसले. बगीतॅ तॅ का? तिहरॉ नगरसेवक (रोटी) फांदीवर गाव्या लागलॅ अन तॉ आख्खॉ मुगल्याई वेंग्यात घॅतलॅ. 'या मुगल्या सॉकाट जाला तॅ,' सुनीलनॅ मुगल्याकरता प्रार्थना केली. मॅ कय बोयलॉ नाय. ३ विकेट पडलॉत्यो. 'सुनिल पुडॅ जासा गा वळॅसा, मॅ सुनिलला घाबरातुस विसारला. नाय ५ ई रोट्याव हिशोब लागलॉ पाय, यात कय तरी राजकारन हाय. आयला, आतॅ याला का हांग्यासा. एक तॅ ऑ तापट वरती स्वाभिमानी. मॅ हांगिला सुनिल, तुआ पॉर हांगातोतॉ तॅ आपुन आगास रोडला जाय गा? दोन त्या वाटेला गेल्यात हायद्यात. सुनिलनॅ मावर डॉळॅ भॉटे कॅलॅ. मॅ माव हिसाब सुकतॉ कॅलतॉ.

जाला, आमॅ भंडारआळी पार करॉन बोळींज हॉपारा रोडला लागले. नॅमकॉ राम मंदिरासमोर उस्सॉ स्पीडब्रेकर. 'आयला या महापालिकेनॅ देवाला पय ना होडला ता रॅ,' मॅ सुनिलला हांगिला. आमॅ गाडी थांबविली अडे तडे नजार मारली. रोटी कय नंदऱ्या पडली नाय. बाजूला खांबाखाला एक कुत्रा जाम आहातोता. माला डाउट आलॉ पन कुत्र्याला कहा विसरॅसा. पन कुत्र्याआ तॉडाला तॅल दिखातॉता. मॅ सुनिलला खून केली. सुनिलशी हीर तापली. वेडxxxये साले, सोर येत्यात तिगाळा निजात्यात अन आतॅ बरे जागे रेत्यात. मॅ सुमडीमिनॅ गाडी सुरू केली. ४ नगरसेवक हापडलॉतॅ. आमॅ पुडॅ निगाले अन १० फूट पुडॅ जाय तॅ रमेश वकीलशा आंगळ्यासॉ स्पिडब्रेकर आलॉ. सुनिल मार्गॅ ऑथॉ. थांबण्याशिवाय पर्याय नॉतॉ. आमॅ अडे तडे बगीला. तळयाबाजूला २ मांजरीआ कसका पडलॉता. दोगामिनॅ १ रोटी ओळख पटवण्यापलिकडे मार खातोती. माला रोटीई हालत बगॉन नेल्सन दमेलशा गोष्टीसॉ कळयाव काळॉ सुंबिलॅलॉ लाडू आठवालॉ. 'अडे पासर अहीलॉशी तॅ यांशे डोखे फोटलॉशे,' सुनिलनॅ प्रेमानॅ मांजरीवर बगॉन हांगिला. आमशा ५ व्या रोटीऑ शोध लागलॉतॉ. तहा बगीला तॅ रमेश वकिलशा आंगळयात आमे केस हरलोते. माला समाधान या ऑथा गा मॅ राजकारन कॅला नाय ता मॅ सुनिलला डॉळयादेखत सिध्द कॅलता.

मॅ सुनिलला हांगिला आतॅ आल्यास बोळींजला तॅ घारा शा घॅ सल. सुनिलनॅ मुंडी हालविली. घारा पोसले अन मम्मीला शा करॅआ हांगिलॉ. मॅ सुनिलला रोट्यो द्या गॅलतॉ अन सुनिलला घॅऑन मॅस घारा आलॅ ई मम्मीला कय उमजाला नाय. सुनिल शांत ऑथॉ, बवतेक मनातशा मनात स्पीडब्रेकर फोटतोतॉ हायदॅ.
मम्मीला विसारला 'एखादी रोटी हाय गा' तॅ मम्मीनॅ 'मालास रेली नाय' अही कम्पलेंट केली. मा तोंडाला रोटी लागलॉती पन ऑ डबलसीट हाडलॅ तॅआ का करॅसा. ऑ हुक्कॉस जाय ई माला कळला. सुनिल शांतस ऑथॉ. जेपीनगर शे स्पीडब्रेकर मनातशा मनात जाग्या लागलॅ हायद्यात याव माला अंदाज आलॉ.
मम्मीनॅ शा कपात वाळ्या लाविलतॉ बस ऑड्यात माई लेक आली. 'डॅडी, मम्मीनॅ शिशीन वयनीच्या घरी रोट्या द्यायला दिलेल्या पन ते सगळे दमनला गेलेत अन परवा यायचे'. मॅ सुनिलशा तोंडोर बगिला अन सुनिलनॅ मा तोंडोर. मॅ पोरीशा आथातशी पिशवी मा आथात घेतली आन सुनिलशा हातात दिली. सुनिलला दमन पावलॉता. मॅ हुटलॉतॉ. सुनिलनॅ शा तॉडाला लाविलॉ. मॅ आतमिनॅ जाऑन कापडी पिशवी हाडली अन रोट्यो त्यात टाकील्यो. पुन्ना रिस्क कून घॅतॅ. रोट्यापेक्षा सुनिल उनॉ.
राती सुनिलसॉ वॉट्सअँपवर मॅसेज आलॉ. बवतेक अर्ज ऑथॉ. मॅ वाशा सुरूवात केली,

'प्रति,
आयुक्त
वसई-विरार महानगरपालिका,

विषय: स्पीडब्रेकरमुळे झालेली नुकसान भरपाई मिळणेबाबत'

मॅ विसार केलॉ आयुक्त सतीश लॉखंडेला बहुतॅक आतॅ रोट्यो काड्या लाग्यात.

# तिथी वार आन कुपारी ... – शिमा लुद्रिक, आगाशी

२४ ऑक्टोबरशा (ता बी २०१५ शा) आय बेट या कुपाऱ्याआ फेसबूक ग्रुपवर भाटीतशा सॅबीशा बर्थडे पोस्ट वर एकानॅ हॅपी बर्थडे कमेंट केली, आन मंग मांगसा, पुडसा, वरसा, खालसा न वाशीता खूप जनायी हॅपी बर्थडे कमेंट केली. आन त्यातनॅस मराठी कॅलेंडर नुसार तिथी वार ऑ विषय निंगालॉ...

आजकाल आपल्याला मराठी नातॅ हिंदू कॅलेंडर परमानॅ का तारीक हाय, कुहनॉ मयनॉ हाय या कयीस पत्तॉ नाय आन लॅना दॅना पन नाय... पन कायिक वहरा आदी आपल्या लोकां उत्पाना सादन मनजॅ भाटासा उत्पान आन आगाय, नंदाखाल, नानभाट अडशा लोकां मेन सोर्स ऑफ इनकम मनजॅ फुले... जवळपास दर ४/५ घरां मांगे एक तरी फुलवालॉ अह्यासॉ, जॉ दादर फुलमार्केट मीनॅ हाकोटे काळोख्याय ३.३०, ४.० आन ४. २० गाडी पकडॉन जासॉ...

आन फुलांना मीळनारॉ भाव हिंदू कॅलेंडर परमानॅ तिथी वार वरती अवलंबून अह्यासॉ (अजूनही अहाते) .. मंगळवार मनजॅ गनपती वार, तॅआ दिहा जास्वंदीला (डासुंग) जाम भाव , मंग दर मयन्याला ॲनारी संकष्टी ... संकष्टी मनजॅ चतुर्थी ... कृष्ण पक्षात ॲनारी... आतॅ इ कृष्ण पक्ष का भानगड हाय? पौर्णिमे नंतर अमावास्ये पोत कृष्ण पक्ष... आन आमावश्ये पासून पौर्णिमेपोत शुक्ल पक्ष... अमावशे दिहा मयन्याव शेवटसॉ दी... दुहऱ्या दिहापासून नवॉ मयनॉ सुरु आन पौर्णिमे दिहा १५ तारीक आन अमावास्येला ३० तारिक ऑहॉ सादारन हिशेब...

तर, संकष्टी जर मंगळवारॅ आली तॅ तॅला अंगारकी हांगातॅत... तॅआ दिहा तॅ आपल्या फुलाला शार पैशे वाडीस भाव... तॅतॅन आपल्या फुलवल्याओ धंदॉ या तिथी वार वरती अवलंबून अहातॅ, भगून फुलाला भाव कुहन्या सीजन मीनॅ येतॅ?, लग्नाॲ मुहूर्त कतॅ आथ? अधिक मयनॉ कतॅ येतॅ? पितरे कतॅ? (अधिक मयन्यात आन पित्रात फुले टाकॉन द्याशे ऑथ्यात कारन शुभ कार्य, पूजा या काळात ऑथ नात..) गिरान कतॅ? (गिरान हायदॅ तॅआ दिहा पन फुले टाकॉन द्याशे... गिरान मंजे ग्रहन...)

आपल्या अडशॅ काइक हुशार बागायतदार कागडो, नेवाळी, मॉगरॉ, जास्वंद नेमकॉ वखत बगॉन अह्या वेळेला छाट्याशे नातॅ तॉड्याशे गा नॅमका जिगाळा सीजन अह्याशी तिगाळा नेमकी भर याशी.. (छाटनी आन भॉखॉ तॉडॉन ॲनारा फुल थांबव्यासा आन नंतर नवीन भॉखॉ आन फुल कतॅ ॲनार याव नॅमकॉ अंदाज घॅना इ कला खूपशा फ़ुलवाल्याना तिगाळा ओथी)

समुद्राला ॲनारॅ भरती ओटी वॅळपन तिथीपरमानॅ बदलातॅत. आपल्या अडे मशालॉ, लॉनसा, भात, साउळ यो वस्तु ओटीआ काळात भरल्यो तॅ तॅला किड ये नाय, वस्तु खराब हॉॲ नाय ऑ समज ऑथॉ. अंदाजपंचे भरती-ओटीऑ अंदाज हांगनारॅ बेताम अहले तरी पन तिथी बगॉन भरती-ओटी इ नेमकी वेळ हांगनारॅ तीनशार जानते गव आपल्या पंचक्रोशीत ऑथॅ.

काळापरमानॅ  आतॅ आपल्या पिढीला या मेहनतीआ पन अगदी योग्य मोबदलॉ दॅनाऱ्या धंद्यामीनॅ ईंटॅरेस्ट रॅलॉ नाय..  पन मा हारक्या फुलवाल्या घारा जन्मा आलॅल्याला ऑ तिथी वार अगदी डॉख्यामीनॅ फिट बॅहॅलॅ...

# कुपारी लोक - **रॉबर्ट फर्नांडिस, मर्देस**

फादर एकदम बेचैन झालतॉ, कारन पन तॅला तहास हॉता, आजपोत अही वेळ त्यापुडॅ कतॅ आली नोती आन अह्या प्रसंगाला प्रार्थना हॉडॉन त्या बाईकरता कइस करू शकात नॉतॉ. १८ तारीख होती, देवळाव हिशोब १० तारखॅला भरलॉ जातॅ, तॉ सगळॉ व्यवहार चर्चसा कार्यकारिणी मंडळ हाय ता बगीतॅ. फादर त्या बाईला बोयलॉ, "मा दरी कय नाय पन मॅ अडश्या एक-दोन दानशूर लोकांना बॉलातॅ. फादरला तियी परिस्तिती कळालती.

फादरशॅ पाय पकडीत रडात रडात ती बाई बोयली, "फादर, माव एकशॅ एक पॉर, डायलेसिस आन रगात बदल्या लागातॅ, मा दरी हॉता नॉता ता विकीला, कइस रॅला नाय, सगळया दरी जाऑन झालॅ, आतॅ पैशॅ नात भगून या मइन्यायी ट्रीटमेंट लेट झालॅ, डॉक्टर हांगातॅ की एक-दोन दिहात जर कय हालसाल नाय केली, तॅ तूआ पोराआ जिवासा कय बरा-वाईट हॉयॅदॅ. फादर, मायो सगळयो आशा खपल्यात भगून मॅ तुमश्या दरी आलॅ."

यी सगळा आयकॉन फादरशॅ डॉळॅ पाण्यायॅ भरलॅ, त्या दरी कय नॉता आन कय मार्ग पन दिखात नॉतॉ भगून त्यानॅ मांडी टेकिली, बायबल हातात घॅतला आन डॉळॅ बंद करॉन तॉ प्रार्थना कऱ्या लागलॉ, समोर अहलेली ती अख्रिस्ती बाई बोयली, "माव प्रभू येशूओर खुब विश्वास हाय आन त्यायॅ अडशॅ कुपारी लोक खूब प्रेमळ आन दयाळू हात, कय पान झाला तरी मॅ अडनॅ रिकाम्या हाती जानार नाय ऑडॉ माव अडश्या या लोकोओर भरवसॉ हाय" ऑडा बॉलॉन तीसुद्धा डॉळॅ बंद करॉन प्रार्थना कऱ्या लागली.

दॉपारशॅ साधारन १२-१२-३० वाजले हायद्यात, दरवाजायी बेल वाजली, मॅस्तानॅ दरवाजॉ उघडलॉ, समोरनॅ आवाज आलॉ, "फादर, मॅ अमुक अमुक , मॅ अडॅ रॉज प्रार्थना कऱ्या यासॉ, मायी नोकरी गेलती आन माला या वयात परत मिळाली, दॅवाशॅ आभार भगून मायी यी छोटीशी मदत तुमश्या देवळाकरता... अहॅ शब्द कानोर पडताबरोबर फादर ताडकन उठलॉ आन बोयलॉ, प्रभू जिवंत हाय, आन तॉ कुनालास टाकी नाय आन त्याला कइस अशक्य नाय.

"यी देनगी तू या बाईला देऊ शकाता गा ?" फादरनॅ त्या माहनाला विसारला. त्या माहना मनात आला, यी बाई अख्रिस्ती, या लॉकायी आपल्या खुब फादर-सिस्टर्सना मारलॅ, आपलॅ चर्च पाडल्यात, अह्या लॉकांना मदत कादो कऱ्याशी ? पन परत त्या मनात आहा पन आला, या बाईसा याशी संबंध का? दॅवानॅ हांगिलॅ की जे गरीब ते मायॅ लोक, त्यांना जा दिला ता मा दिला. तॉ चेक त्यानॅ फादरश्या हातात दिलॉ. फादरनॅ तॉस चेक त्या बाईला दिलॉ, ती डॉळ्यात पानी आलॉ, दोन मयन्या ट्रीटमेंट सॉ खर्च हुटलॉतॉ.

ती बाई बोयली," मॅ एक अख्रिस्ती बाई, तुमश्या कुपारी लॉका हारकॉ समाज मॅ कडॅ बगीलॉ नाय.. त्यायी कडे दंगल केले, कुनोर अत्याचार कॅल्यात, कुनाला फसविलॅ-लुटीलॅ, मदत कऱ्या तुमॅ लोक नेहमीस तयार आहात्या. तुमश्या सांगल्या करता मॅ नेहमीस प्रार्थना करनार आन अडॅ या देवळात यॅवॉन करनार. तुमसॉ कुपारी समाज टिकलॉ पाय, तरुस आमश्या हारक्या गरीबांना जीवन जगता येदॅ."

# दादी

जकल्या घारा तांबड्या लुगड्याई दादी,
जकल्याहरी ऱ्याशी एकदम सादी.
कानात वाळयो आण गळयात हिरान,
दादीला घरात हॉतॉ वरसॉ मान.

दादी रॉश्शी मिसाला जाशी,
देवळात पांडा खॉयारा डोख्योर घ्याशी.
आख्खॉ दी भाटात खप खप खप्याशी,
घारा आली गा पॉरायॅ लाड कऱ्याशी.
दादी जिवाशी हॉयाशी खुप तान-ओड,
पन ती कत्तॅस काड्याशी नाय कुणाई खोड.

भॉट्या कुटुंबाहरी ती खुप खुश होती,
पॉराआ मस्तीला ती वैतागली नोती.

शार-स पोरे दादीनॅ सॉता वाडविले,
पन बाळगी हातात नाय दिले.
दादीई संख्या हळुहळु कमी हॉत गेली,
तांबड्या लुगड्याई बय आमश्या ध्यानात रेली.

**--- फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे**

# हिरान-तांबडा लुगडा

गळयात हिरान, तांबडा लुगडा नॅहॉन मिरवातॅ बग भोटी बय
हजले इ कॉडी मस्त, बॉल्याशी नाय कय सोय

घॉॲळा डोख्योरनॅ घॅवॉन ती देवळा गेली
पदर खोशिलॉ आन भाटात गेली
खांद्योर रुमाल टाकिलॉ पावन्या घरा गेली
माथ्योर शंभरायी पाटी घॅवॉन बजारा गेली

उटीमीनॅ नातवादो खान्यायी पुडी निकविली
पन ती द्याशी वेळ दुऱ्या दीहा आली
कमऱ्याला सशी काईमशी टांगलेली
कर्तॅ त्यात दिडकी नार्तॅ नुस्तीस खाली अहलेली

वाडवाला ता हिरान आर्तॅ, पोवळॅ आन भिनू झार्लॅ मोकळॅ
शार बाहा, दोन बेन्यो त्या करता किती तरी दी भांडर्लॅ
एकमेका तॉंडोर तॉंड द्याशे रेर्लॅ
इस गा ती किमत त्या मा बयशी ठवीर्लॅ

लाल लुगड्याशॅ पन पायपुहने झाल्यात
मिन्गारश्या दारात त्याये फडके पायाखाला पडल्यात
हनावाराला आन लग्नाला आर्तॅ भराते कपड्याव बाजार
नवीन फॅशन सॉ आर्तॅ झार्लॅ आमाला आजार.

**-- ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा**

**या अंकाव सब्बान खर्च ॲका अनामिक माहनार्नॅ दिर्लॅ, तॅयॅ आभार**

**आन त्या कुटुंबाकरता दॅवादरी मनापासून प्रार्थना**